## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. १५ जुलै २०२२

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४२५/२०२२ भादंविसक ३७९,४२७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०७/२०२२ रोजी २२.०० वा ते दि. १३/०७/२०२२ रोजी सकाळी ०७.३० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. १३/०७/२०२२ रोजी १८.२५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | गणेश तानाजी पवार, वय- ३६ वर्षे, व्यवसाय- वकील, रा. बी १/२, रामचंद्र शेटे नगर, लक्ष्मी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | २०,०००/- रु त्यात एक्साईड बॅटरी, दोन फॉगलॅम्प बल्ब, ईसीएम, एक सायरन, एक टेप |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची चारचाकी विटारा ब्रिजा क्रं. एम एच १३ डी ई ७३३७ ही त्यांचे घराचे समोरील अंगणात कंपाऊंड लगत पार्क केली असताना, सदर गाडीचे पुढील बंपर, मेन वायरींग, इंजिन वायरिंग, उजवीकडील व डावी कडील फेन्डर, लायनींग, फेन्डर कव्हर, एबीएस सेन्सर, डिझेल पाईप बोनेट केबल, डॅश बोर्ड वायरींग यांची कोणीतरी अज्ञात चोरटयाने अज्ञात कारणाने तोडफोड करुन, फिर्यादीच्या गाडीचे ५०,०००/- रु चे नुकसान केले आहे. तसेच फिर्यादीच्या गाडीतील वरील वर्णनाचे साहित्य चोरुन नेले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ९९ भोसले |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३७७/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १२/०७/२०२२ रोजी २२.३० वा ते दि. १३/०७/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरासमोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. १३/०७/२०२२ रोजी २०.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सलीम बशीर शेख, वय- ३० वर्षे, रा. समता नगर, मुळेगाव रोड, अलकौसर मस्जिद जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | ५०,०००/- रु एक काळया पिवळया रंगाची तिनचाकी रिक्षा |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची रिक्षा क्रं. एम एच १३ सी टी ३२२२ ही फिर्यादीचे राहते घरासमोर रोडच्या कडेला लावलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची रिक्षा फिर्यादीच्या संमतीवाचून, मुददाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोना/ २७३ गायकवाड |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५४/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १३/०७/२०२२ रोजी १४.३० वा ते १८.०० वा चे दरम्यान, तेर- उस्मानाबाद-सोलापूर ए टी एस टी बस प्रवासात, सोलापूर एस टी स्टॅन्ड ते इंचगिरी मठ दरम्यान, रिक्षा प्रवासात, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. १३/०७/२०२२ रोजी १९.०९ वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सौ. विदया धनंजय शेटे, वय- ५७ वर्षे, रा. ३२/बी, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अनोळखी तलगु भाषिक महिला |
| **गेला माल** | **:** | १) १,३५,०००/- रु एक सोन्याचे साखळीचे गंठण त्यात काळे मणी असेलेले ४ तोळे ४ ग्रॅम वजनाचे<br>२) १,००,०००/- रु एक सोन्याचे पट्टी डिझाईनचे गंठण ३ तोळे ४ ग्रॅम वजनाचे<br>३) १२,०००/- रु एक सोन्याचे तीन पदरी लेटेस्ट बोरमाळ साडेतीन ग्रॅम वजनाचे<br>४) ३,०००/- रु रोख रक्कम<br>एकुण- २,५०,०००/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या तेर-उस्मानाबाद-तुळजापूर- तामलवाडी मार्गे सोलापूर असा एस टी ने प्रवास करीत असताना एस टी बस ही तामलवाडी जवळ आली असताना, फिर्यादीच्या शेजारी बसलेली अनोळखी तेलगु भाषीक महिला हिने फिर्यादीचे वरील वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरले असावे असा फिर्यादीचा संशय आहे म्हणून.<br>**टिप:- सदरचा गुन्हा तामलवाडी पोलीस स्टेशन, उस्मानाबाद येथे वर्ग करण्यात आला आहे.** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ५२६/२०२२ भादंविसक ४२०,४६५,४६७,४६८,४७१ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०७/०१/२०२१ रोजी उत्तर तहसिल कार्यालय व दुय्यम निबंधक कार्यालय, जिल्हा परीषद, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. १३/०७/२०२२ रोजी २१.४६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सोहेब अब्दुल हाई शेख, वय- ४५ वर्षे, व्यवसाय- व्यापार, रा. ४०६, बी/२, पी.एम.जी.टी कॉलनी, सायन बांद्रा लिंक रोड, सायन पश्चिम, मुंबई |
| **आरोपीचे नाव** | **:** | मुजीब अब्दुल हाई शेख |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे व्यवसायानिमित्त मुंबई येथे राहण्यास आहेत. फिर्यादीचा लहान भाऊ(वरील आरोपीत) हा फिर्यादीच्या आई वडीलांसोबत सोलापूर येथे राहण्यास असुन, फिर्यादीचे आईचे नावे असलेल्या सोरेगाव येथील गट क्रं. १४२/२/ब/१ ही शेतजमीन वरील आरोपीत याने फिर्यादीच्या वडीलांना दमदाटी करुन खोटे कागदपत्र बनवुन सदर शेतजमीनीचे दोघेच वारसदार असल्याबाबत खोटे प्रतिज्ञापत्र सादर करुन सदर शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर नावे लावुन घेतले. त्याचप्रमाणे वरील आरोपीताने आईचा देखील खोटा हिबानामा केला. सदर हिबानामा हा पर्णतः खोटा व बनावट आहे. त्यावर ओळख म्हणून तज्ञ वकीलांचे नाव व सही देखील नाही. यातील वरील आरोपीताने सदर तथाकथीत व बेकायदेशीर हिबानाम्याचे आधारे हिबानामा मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे उतारऱ्यास बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करुन भ्रष्ट अधिकारी यांचे सोबत संगनमत करुन मिळकतीच्या उताऱ्यास स्वतःच्या नावाची बनावट हिबानाम्याचा वापर करुन वडीलोपार्जित मालमत्तेवर आम्हा भावंडाचा हक्क असताना परस्पर स्वतःचे नाव लावुन फिर्यादीची तसेच फिर्यादीची बहिण सामिया व गौहर यांची फसवणुक केली आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीताविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे. तपासः- पोसई/ माळी- **८८८८५२०९७** |